FROM : DGP FAX NO. : 02472222700 18 Feb. 2013 05:30 P 1

उद्धबोधन
मा. स्व. प्र. कापडणीस,
~~कार्यासन अधिकारी~~
~~विधी व न्याय विभाग~~
मंत्रालय, मुंबई.

जा.क./371/2013
जिल्हा सरकारी वकील यांचे कार्यालय,
उस्मानाबाद
दिनांक :— 18.02.2013

प्रति,

मा. वि.कि.आल्हाट,
शासनाचे सह सचिव,
विधी व न्याय विभाग,
मंत्रालय, मुंबई.

प्रेषक :

श्री.व्ही.बी.शिंदे
जिल्हा सरकारी वकील, व
जिल्हा सरकारी अभियोक्ता,
उस्मानाबाद.

विषय :— नागरिकांची सनद प्रसिध्द करणे हा विषय सन 2012—13 साठीच्या KRA मध्ये प्रसिध्द करणे.

संदर्भ :— 1. मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क.केंमाअ 2012/प्र.क.11/का.7 दिनांक 19.11.2012 प्राप्त दिनांक 27.11.12
2. मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क. केंमाअ 2012/प्र.क.10/का.7 दिनांक 17.1.13
3. मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क. केंमाअ 2012/प्र.क.10/का.7 दिनांक फेब्रु.2013

आदरणीय महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, नागरिकाची सनद प्रसिध्द करणेसाठी नियम 4 खाली 17 बाबी मधील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिका—यांचे फलक दर्शनी ठिकाणी प्रदर्शित करण्यात येत आहे. तसेच जिल्हा सरकारी वकिल कार्यालय, उस्मानाबाद या कार्यालयाची माहिती दोन प्रतीत सोबत पाठविण्यात येत आहे.

सबब जिल्हा सरकारी वकिल कार्यालय, उस्मानाबाद या कार्यालयाची माहिती वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

(व्ही.बी.शिंदे)
जिल्हा सरकारी वकील,
उस्मानाबाद

सोबत : सी.डी.जोडलेली आहे.

# जिल्हा सरकारी वकील कार्यालय, उस्मानाबाद

## नागरिकांची सनद

## (Citizen Charter)

(एक) आपली संघटना, तीची कामे व कर्तव्य यांचा तपशील :—

या कार्यालयाचे नांव जिल्हा सरकारी वकील कार्यालय, उस्मानाबाद असे आहे. हे कार्यालय विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहे.

कार्यालयाचा पत्ता : जिल्हा सरकारी वकील कार्यालय, उस्मानाबाद.
द्वारा जिल्हा व सत्र न्यायालय, मेन रोड,
उस्मानाबाद — 413501
दुरध्वनी क. 02472 — 222618
02472 — 227733
फॅक्स क. 02472 — 227733

हे कार्यालय उस्मानाबाद जिल्हा मुख्यालयी आहे. संपुर्ण जिल्हा व तालुका कार्यालयासह येथे एकूण 7 सरकारी वकील कार्यरत आहेत. या कार्यालयाच्या अधिपत्याखाली पुढील 2 तालुका स्तरावर कार्यरत आहेत.

1. सहायक सरकारी वकील कार्यालय, उमरगा
2. सहायक सरकारी वकील कार्यालय, परंडा

<u>या जिल्ह्यातील विधी अधिकारी यांची नांवे व दुरध्वनी कमांक :</u>

| अ.क. | नांव | पदनाम | मोबाईल कमांक |
|---|---|---|---|
| उस्मानाबाद मुख्यालय | | | |
| 1 | श्री.व्ही.बी.शिंदे | जिल्हा सरकारी वकील, उस्मानाबाद | 9822302836 |
| 2 | श्री.पी.वाय.जाधव | सहाय्यक सरकारी वकील, उस्मानाबाद | 9422377575 |
| 3 | श्री.डि.डब्ल्यू.पाटील | सहाय्यक सरकारी वकील, उस्मानाबाद | 9423072907 |
| 4 | श्रीमती पी.बी.तांबारे | सहाय्यक सरकारी वकील, उस्मानाबाद | 9420839789 |
| तालूका कार्यालये | | | |
| 1 | श्री.व्ही.एस.आळंगे | सहाय्यक सरकारी वकील, उमरगा | 9422466365 |
| 2 | श्रीमती.एस.ए.पोतदार | सहाय्यक सरकारी वकील, उमरगा | 9423718575 |
| 3 | श्री.एम.एम.कदम | सहाय्यक सरकारी वकील, परंडा | 9422465898 |

कर्मचारी वृंद :–

| | | |
|---|---|---|
| कर्मचारी वृंद :– | वरिष्ठ लिपीक | 01 |
| | लिपीक–नि–लघुटंकलेखक | 02 |
| | कनिष्ठ लिपीक | 04 |
| | शिपाई | 01 |

<u>तालुका स्तरावरील कर्मचारी वर्ग</u> :

कनिष्ठ लिपीक 01 (प्रत्येक तालुका कार्यालयासाठी त्या त्या न्यायालयाकडून प्रतिनियुक्तीवर दिलेला.)

(दोन) <u>कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्य</u> :--

जिल्हा सरकारी वकील यांना कार्यालय प्रमुखाचे व काही बाबतीत विभाग प्रमुखाचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे. जिल्हयातील कोणत्याही राज्य शासकीय कार्यालयास त्यांचे कार्यालयीन कामकाज पार पाडीत असतांना काही कायदेशीर अडचणी येत असतील किंवा एखादया शासन निर्णयाचा /कायदयाचा अर्थ लावतांना कांही संदिग्धता निर्माण होत असेल तर अशा प्रसंगी त्या कार्यालयाच्या विनंतीनुसार त्यांना मार्गदर्शन व लेखी अभिप्राय दिला जातो. तसेच त्यांच्या कार्यालयाची काही प्रकरणे न्यायप्रविष्ठ असतील तर त्या प्रकरणामध्ये किंवा कांही प्रकरणांमध्ये उच्च न्यायालयात अपिल करण्याचा किंवा न करण्याचा अभिप्राय दिला जातो.

कार्यालय पारदर्शी व गतिमान चालण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणे. तसेच स्वतःसह सर्व सहायक सरकारी वकीलांना दिवाणी, फौजदारी व भूसंपादनाची प्रकरणे शक्यतो सम--समान वाटप करणे व ते निकाली होईपर्यंत त्यात वेळोवेळी आवश्यक ती मदत करणे. मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद यांनी पुरविलेल्या वर्ग 3 व 4 कर्मचा--यांना विभागवार कामाचे वाटप करुन ते काम सुरळीतपणे करुन घेणे.

तसेच निकाली प्रकरणांमध्ये अपिलाच्या संदर्भातील कार्यवाही करण्यासाठी योग्य ते सर्व आवश्यक कागदपत्रांचा पुरवठा करुन सहाय्यक सरकारी वकीलांना अपिल करण्यासाठी कर्मचारी वर्ग सहाय्य करीत असतात. तसेच सरकारी वकीलांनी काम

पाहिलेल्या फौजदारी प्रकरणामध्ये मानधन व फीसची देयके संबंधित कर्मचा–यांकडून तयार करुन घेतली जातात व ती जिल्हा कोषागाराकडून पारीत करुन घेवून संबंधितांना वाटप केले जाते. तसेच भू संपादन

प्रकरणाच्या फीसची देयके तयार करुन संबंधित विभागास पाठविण्याची कार्यवाही कर्मचारी वर्गाकडून केली जाते. तसेच वर्ग 3 व 4 चे कर्मचारी जिल्हा सरकारी वकीलांच्या निर्देशाप्रमाणे उपरोक्त सर्व कामे नियमानुसार पार पाडत असतात.

(तीन) <u>कार्यालयाच्या निर्णय घेण्याच्या प्रकियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायीत्व प्रणाली</u> :–

या कार्यालयाची कार्यपध्दती जिल्हा सरकारी वकील, उस्मानाबाद यांच्या अधिकारक्षेत्राखाली कार्यरत आहे. तसेच याबाबतीत वेळोवेळी मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद व विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचा व आदेशांचा समावेश होतो. तसेच हा न्यायीक विभाग असल्याने कायदा व नियम यांनी अनुबंधित केलेल्या तरतुदीनुसार निर्णय घेतले जातात.

(चार) <u>कार्यालयाचे कार्य पार पाडण्यासाठी ठरविण्यात आलेली मानके</u> :–

जिल्हा सरकारी वकील, उस्मानाबाद या कार्यालयात दिवाणी, फौजदारी व भू संपादनाची सर्व प्रकरणे जिल्हा सरकारी वकील व सहाय्यक सरकारी वकीलांना महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या दैलनंदिन मोबदल्याच्या अनुषंगाने कामाचे वाटप करतात आणि विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून मिळणा–या सूचना व आदेशानुसार कामकाज चालते.

(पाच) आपली कामे पार पाडण्यासाठी त्याने निर्धारण केलेले किंवा त्यांच्या नियंत्रणाधीन असलेले किंवा त्यांच्या कर्मचा–यांकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, निर्देश, नियम–पुस्तिका व अभिलेख यांचा तपशील :–

दिवाणी व फौजदारी नियमसुचीद्वारे Civil and Criminal Manual द्वारे कर्मचा–यांची कर्तव्ये ठरविण्यात आलेली आहेत व त्याला अनुसरुनच त्यांना ती कर्तव्ये पार पाडावी लागतात. तसेच मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आणि जिल्हा सरकारी वकील, उस्मानाबाद यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, निर्देशित केलेल्या परिपत्रकाप्रमाणे कर्मचारी वर्ग कर्तव्ये पार पाडत असतात.

(सहा) या कार्यालयाकडे असलेल्या किंवा या कार्यालयाच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गांचे विवरण :–

| | | |
|---|---|---|
| कामकाज नोंदवहया : | 1 | सत्र प्रकरण नोंदवही |
| | 2 | दिवाणी प्रकरण नोंदवही |
| | 3 | भूसंपादन प्रकरण नोंदवही |
| | 4 | निकाल नोंदवही |
| | 5 | अपील नोंदवही |
| | 6 | प्रकरण वाटप नोंदवही |
| | 7 | जामीन प्रकरण नोंदवही |
| प्रशासनीक व वित्त नोंदवहया : | 1 | हजेरी पट |
| | 2 | सेवा पुस्तक/सेवा पट |
| | 3 | मासिक वेतन नोंदवही |

4 रोजकिर्द नोंदवही

5 वेतन पट

6 देयक नोंदवही

7 गोपनिय नोंदवही

8 अभिप्राय नोंदवही

9 अग्रिम नोंदवही

10 कोषागार नोंदवही

11 आवक जावक नोंदवही

12 टपाल व मुद्रांक नोंदवही

13 जड वस्तु संग्रह नोंदवही

(सात) आपली धोरणे तयार करण्याच्या किंवा त्यांची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात जनतेतील प्रतिनिधीत्व करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यक्तीशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदन केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशिल :-

जिल्हा सरकारी वकील कार्यालय, उस्मानाबाद हे कार्यालय न्यायीक विभाग असल्याने सरकारी वकीलांना कायदयातील तरतुदीनुसारच काम करावे लागते. त्यामुळे या कार्यालयात धोरण तयार करण्याच्या किंवा एखादया विशिष्ट धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदन केले जाण्यासाठी कोणतीच स्वतंत्र अशी व्यवस्था नाही.

(आठ) मंडळाचे, परिषदांचे, समित्याचे आणि त्यांचा भाग बनलेल्या किंवा त्यांना सल्ला देण्याच्या प्रयोजनार्थ असलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या इतर संस्थांचे आणि अशी मंडळे, परिषदा, समित्या व इतर संस्था जनतेसाठी खुल्या आहेत

किंवा कसे, किंवा अशा बेठकांची कार्यवृत्ते जनतेस मिळण्यायोग्य आहेत किंवा कसे या संबंधीचे विवरण :—

जिल्हा सरकारी वकील, उस्मानाबाद या कार्यालयात सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी कुठलेही मंडळ, परिषदा किंवा समिती नाही.

(नउ) या कार्यालयातील अधिका–यांची आणि कर्मचा–यांची निर्देशिका :—

जिल्हा सरकारी वकील, उस्मानाबाद या कार्यालयाचे प्रमुख हे जिल्हा सरकारी वकील असतात. त्यांच्या अधिपत्याखाली इतर सर्व सहायक सरकारी वकील कार्यरत असतात. जिल्हा सरकारी वकील यांनी वाटप केलेल्या कामानुसार सर्व सहायक सरकारी वकील हे जिल्हा न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय, व.स्तर, ग्राहकमंच इत्यादी न्यायालयात फौजदारी, भूसंपादन, दिवाणी, मोटार अपघात, ग्राहक तकारी इत्यादी प्रकरणांमध्येशासनाच्या वतीने बाजू मांडण्याचे काम करतात. सर्व सरकारी वकीलांना कार्यालयीन कामकाजात मदत करण्यासाठी मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीशाकडून कर्मचारी वर्ग पुरविला जातो.

(दहा) या कार्यालयातील प्रत्येक अधिका–यास व कर्मचा–यास मिळणारे मासिक वेतन, तसेच प्राधिकरणाच्या विनियमांमध्ये तरतुद केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याच्या पध्दतीचा तपशील :—

जिल्हा सरकारी वकील, उस्मानाबाद या कार्यालयात नेमण्यात आलेल्या सर्व सरकारी वकीलांना महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या नियमानुसार व दरानुसार फीसची देयके अदा केली जातात. तसेच वर्ग 3 व 4 या कर्मचा–यास मा.जिल्हा व सत्र न्यायालयाकडुन पुरविण्यात आलेल्या अनुदानातून वेतन अदा केले जाते. तसेच या कार्यालयात कोणतेही काम विशिष्ट अशा शारिरीक जोखमेचे नसलेने त्यांना कोणत्याही प्रकरणाचे नुकसान भरपाई देण्याची पध्दत प्रचलित नाही.

(अकरा) या कार्यालयाच्या सर्व योजनांचा तपशिल, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमुन दिलेल्या अर्थसंकल्प आणि संवितरीत केलेल्या रक्कमेचा तपशिल :-

जिल्हा सरकारी वकील, कार्यालय, उस्मानाबाद या कार्यालयातर्फे विविध न्यायालयातील दिवाणी, फौजदारी, भू संपादन, मोटार अपघात, ग्राहक मंच इत्यादी प्रकरणात फक्त सरकारची बाजू मांडण्याचे काम केले जाते. या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या योजना राबविल्या जात नसल्याने त्यासाठी प्रस्तावित खर्च दर्शविण्यात येत नाही.

(बारा ) या कार्यालयाची अर्थसहाय कार्यक्रमाच्या अंमलबजावणीरी रित तसेच कार्यालयामार्फत वाटप केलेल्या रक्कम आणि अशा कार्यक्रमाच्या लाभाधिका–यांचा सविस्तर तपशिल :-

जिल्हा सरकारी वकील कार्यालय, उस्मानाबाद व त्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या कोणत्याही सरकारी वकीलास त्यांच्या कामाच्या नियमानुसार दिल्या जाणा–या फीस व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय दिले जात नाही.

(तेरा) या कार्यालयामार्फत दिलेल्या सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे मिळणा–यांचा तपशिल :-

जिल्हा सरकारी वकील कार्यालय, उस्मानाबाद या कार्यालयामार्फत कसल्याही प्रकारचे परवाने, सवलती किंवा प्राधिकारपत्रे दिली जात नाहीत.

(चौदा) इलेक्ट्रॉनिक स्वरुपात निविष्ट केलेली त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या किंवा त्याने धारण केलेल्या माहितीबाबत तपशिल :-

जिल्हा सरकारी वकील कार्यालय, उस्मानाबाद यांची स्वतंत्र अशी कोणतीही वेबसाईट उपलब्ध नाही. तथापि, विधी व न्याय विभाग आणि जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी पुरविलेल्या संगणक व्यवस्थेचाच वापर करुन कार्यालयीन कामकाज चालविले जाते.

(पंधरा) जर सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असतील तर, ग्रंथालये किंवा वाचनालयांच्या वेळांसह माहिती मिळण्यासाठी नागरीकांना उपलब्ध्द असलेल्या सुविधांचा तपशिल :-

जिल्हा सरकारी वकील कार्यालय, उस्मानाबाद या कार्यालयाविषयी नागरीकांना माहिती मिळण्यासाठी माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या नियुक्त्या केलेल्या आहेत. नागरीक योग्य त्या अधिका--यांकडे त्यांच्या आवश्यकतेनुसार माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी अनुसार विहित नमुन्यात अर्ज देवून माहिती प्राप्त करुन घेवु शकतात. तसेच या कार्यालयात विविध विधी विषयक कायदयाची पुस्तके या कार्यालयाच्या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. ती सर्व सरकारी वकील व कर्मचा-यांसाठीच उपलब्ध असतात.

(सोळा) जन माहिती अधिका-यांची नावे व पदनामे आणि इतर तपशिल :-

माहिती अधिकारी : श्री.डी.डब्ल्यू. पाटील,
सहाय्यक सरकारी वकील, उस्मानाबाद.
(मो.नं. 9423072907)

अपिलीय अधिकारी : श्री.व्ही.बी.शिंदे,
जिल्हा सरकारी वकील, उस्मानाबाद
(मो.नं. 9822302836)

तालूका स्तरावरील : उमरगा

माहिती अधिकारी : श्री.व्ही.एस.आळंगे

सहाय्यक सरकारी वकील, उमरगा

(मो.नं. 9422466365)

: परंडा

श्री.एम.एम.कदम

सहाय्यक सरकारी वकील, उस्मानाबाद.

(मो.नं. 9422465898)

(सतरा) विहित करण्यात येईल अशी इतर माहिती :

या कार्यालयाकडून कोणत्याही व्यक्तीने माहिती मागविल्यास कायदेशीर देण्यायोग्य माहिती शक्य तितक्या लवकर उपलब्ध्द करुन देण्याची व्यवस्था केलेली आहे. त्यासाठी म्हणून सर्व अभिलेख वर्षानुक्रमाने ठेवलेले आहेत. तथापि, या कार्यालयामध्ये प्रकरणांसंबंधीची माहिती स्वतंत्र सॉफ्टवेअर अभावी संगणीकत करण्यात आलेली नाही. तसेच, या कार्यालयाने व तालूका स्तरावरील कार्यालयाने त्या त्या कार्यालयाच्या दर्शनी भागावर माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांच्या नावाचे फलक दूरध्वनी क्रमांकासह लावलेली आहेत. तसेच सरकारी साक्षीदारांना योग्य ती माहिती देवून त्या त्या प्रकरणामध्ये त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन वेळच्यावेळी केले जाते.

स्थळ : उस्मानाबाद.

दिनांक : 18.2.2013

(व्ही.बी.शिंदे)

जिल्हा सरकारी वकील,

उस्मानाबाद.

# सन २०१२-१३ या वित्तीय वर्षाकरिता वीज पाणी, दुरध्वनी,भाडेपटटी व कर,वकीलांची फी तसेच प्रवासखर्च या उददीष्ठांखाली अतिरिक्त अनुदानाची मागणी

| अ.क्र. | नियंत्रक अधिकारी | लेखाशिर्ष | उददीष्ट | मेल्या तीन वर्षातील खर्च | | | सन २०१२-१३ करिता केलेली मागणी | सन २०१२-१३ करिता मंजूर अनुदान | डिसेंबर १२ अखेर खर्च | सन २०१२-१३ करिता आवश्यक एकूण अनुदान | सन २०१२-१३ करिता आवश्यक अतिरिक्त अनुदान (रकाना १२-१० ) | सन २०१२-१३ करिता मंजूर अनुदान पूर्णत: खर्च झाल्यानंतर देखील प्रलंबीत राहणा-या देयकांची | अतिरिक्त अनुदानाच्याआवश्यकत स्पष्टीकरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सन २००९-१० | सन २०१०-११ | सन २०११-१२ | | | | | | | |
| | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | मा.जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता,नाशिक | २०१४ न्यायदान ११४(२) | १ | २४,००० | २४,००० | २४,००० | २४,००० | २४,००० | १८,००० | २४,००० | -- | -- | सदरचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे स्वतंत्र आहे.(१ तेर ) |
| | | | ६ | ४०,४८२ | ३३,६९१ | २९,८०६ | ५०,००० | ३०,००० | १०,६०७ | ३०,००० | -- | -- | |
| | | | ११ | -- | -- | -- | ३,००० | ३,००० | ४८० | ३,००० | -- | -- | |
| | | | १३ | २२९,४९९ | १०,४९४ | ३२,९८९ | १००,००० | ३०,००० | २६,९२२ | १२०,००० | ९५,००० | ९१,५३१ | |
| | | | २८ | २,१९४,०५० | ४६६,३९३ | २,०७४,००० | ३,०००,००० | २,०३०,००० | १,४५४,९०० | ३,०००,००० | ९,७०००० | ९७०००० | |
| | एकुण नियंत्रक अधिकारी = ०१ | | | | | | | | | | | | |

- १. उददीष्ट ०१३ नुसार कार्यालयनी खर्च-नाशिक,निफाड व मालेगांव येथील कार्यालयासाठी सन २००९-१० या वर्षात संगणक पुरविण्यात आले आहे, त्याकरीता ॲन्टीव्हायरस सॉफ्टवेअर,टोनर ,स्टेशनरी, कार्टेज, झेरॉक्स मशिन बिल, तसेच फ्रॅन्कींग,दुरुस्त नविन मंजुर झेरॉक्स मशिन खरेदी करणे या करीता अतिरिक्त रुपये ९५ हजार इतकी अनुदानाची आवश्यकता आहे. या करीता स्वतंत्र पत्र जा.क्र.२३१/२०१३ दि.३०/१/२०१३ रोजी पाठविलेले आहे.

२. उददीष्ट ०२८ नुसार सरकारी वकीलांची फी- नाशिक,निफाड व मालेगांव मधील एकुण १३ जिल्हा व सत्र न्यायालयातील कार्यरत सहाय्यक सरकारी वकीलांची देयके जिल्हा सरकारी वकीलांचे कार्यालयातून खर्ची टाकली जातात. सबब सन २०१२-१३ या अर्थसंकल्पीय वर्षासाठी रुपये ३० लाख इतके अनुदान आवश्यक आहे.

( श्रीकर पी.माने )
जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता, नाशिक.